**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०५ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून आझाद मैदान इथं आयोजित भव्य सोहळ्यात देवेंद्र फडणवीस यांनी घेतली शपथ.**
2. **शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस नेते अजित पवार असतील महाराष्ट्राचे नवे उपमुख्यमंत्री.**
3. **एका खाजगी उद्योगाच्या लाचखोरी प्रकरणी संयुक्त संसदीय समितीतर्फे चौकशी करण्याची विरोधकांची मागणी.**
4. **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई महापालिकेची जय्यत तयारी.**

---

**शपथविधी सोहळा**

**महाराष्ट्र राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून, भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी, आझाद मैदानावर आयोजित, भव्य सोहळ्यात आज शपथ घेतली. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी, त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देवविली. यावेळी उपस्थित नागरिकांनी एकच जल्लोष केला.**

***मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस ईश्वर साक्ष शपथ घेतो कि कायदयाद्वारे स्थापित झाले आहे अशा भारताच्या संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगली. मी भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखील. मी महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक व सद्सदविवेक बुद्धीने पार पाडील आणि संविधान व कायदा यानुसार सर्वतरेच्या लोकांना मी निर्भयपणे निःपक्षपातीपणे तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईल.***

**त्यानंतर शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी उप-मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. आजच्या या शपथविधी सोहळ्याला, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या सोबतच, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ**

यांसह, अनेक केंद्रीय मंत्री आणि भाजपचे देशभरातील पदाधिकारी उपस्थित आहेत. एकनाथ शिंदे, अजित पवार, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांसह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील अनेक पक्षनेते या शपथ विधीला उपस्थित आहे. त्याचप्रमाणे सिनेसृष्टीतील अनेक कलाकारांची देखील या सोहळ्याला उपस्थिती आहे. या शपथविधी सोहळ्यापूर्वी, देवेंद्र फडणवीस यांनी, आज सकाळी प्रभादेवी इथं सिद्धि विनायकाचं दर्शन घेतलं. त्यानंतर त्यांनी मुंबईची ग्रामदेवता मुंबादेवी मंदिरात देवीचे दर्शन घेतलं. यावेळी त्यांच्या सोबत भाजप प्रदेशाध्यक्ष, चंद्रशेखर बावनकुळे, नवनिर्वाचित आमदार कालिदास कोळंबकर, राहुल नार्वेकर आदी नेते उपस्थित होते. देशातील महत्वाचे नेते आज, आझाद मैदानात उपस्थित असल्यानं, परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. आजच्या शपथविधी सोहळ्याच्या कार्यक्रमाची सुरुवात, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीतानं झाली.

-------------------------------------------

झारखंड शपथविधी

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी आज मंत्रिमंडळाचा विस्तार केला. रांची इथं राज भवनात झालेल्या समारोहात झारखंडचे राज्यपाल, संतोष कुमार गंगवार यांनी, मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. झारखंड मुक्ती मोर्चाचे सहा काँग्रेसचे चार तर राष्ट्रीय जनता दलाचे एक असे हे मंत्रि मंडळातले अकरा मंत्री आहेत.

-------------------------------------------

संसद- एअर

एका खाजगी उद्योगाच्या लाचखोरी प्रकरणी आज संसदेच्या परिसरात विरोधी पक्षांनी जोरदार निदर्शने केली. विरोधी पक्ष नेता काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्यासह राजद, डीएमके आदी प्रमुख विरोधी पक्षांनी निदर्शनं केली या प्रकरणाची संसदेच्या संयुक्त समितीतर्फे चौकशी करण्याची मागणी यावेळी विरोधकांनी केली. राज्यसभेत आज परदेशातून देशहितावर होत असलेल्या हल्ल्यांचा मुद्दा भाजपा खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी शून्य प्रहरात उपस्थित केला. त्यावर राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी हा गंभीर मुद्दा असल्याचं सांगत त्यावर अधिक वेळ चर्चा करण्याची सूचना केली. त्यावर विरोधी पक्षाच्या खासदारांनी जोरदार आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गोंधळात राज्यसभेचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्यानंतर पुन्हा कामकाजाला सुरुवात झाली. दरम्यान, लोकसभेत आज नागरी हवाई वाहतूक मंत्री किनजारापु राम मोहन नायडू यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं की, देशात सध्या १५७ विमानतळं कार्यरत असून २०१४ मध्ये केवळ ७४ विमानतळंच कार्यरत होती. सरकार देशात विमानतळाच्या जाळ्याला महत्त्व देत

असून सध्या दिवसाला पाच लाख जण देशातंर्गत प्रवास करत असल्याचंही त्यांनी सांगितलं. त्यानंतर संभल इथल्या हिंसाचाराबद्दल एकांगी माहिती समाजमाध्यमांवर पसरवल्याप्रकरणी भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी आज लोकसभेत काँग्रेस पक्षाच्या नेत्यांवर आरोप केले, त्यानंतर विरोधी पक्षांनीही खाजगी उद्योगाच्या आरोपांप्रकरणी चौकशीची मागणी करत गदारोळ केला. त्यामुळे सभापतींनी लोकसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब केलं.

---------------------------------------------

प्रसारभारती

प्रयागराजमध्ये पुढच्या वर्षी होत असलेल्या, महाकुंभ मेळ्या संबंधित विविध कार्यक्रमांबाबत, काल प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गौरव द्विवेदी यांनी, प्रयागराज इथल्या, आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या, वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. या बैठकीत, आकाशवाणीचे संचालक, प्रज्ञा पालीवाल, दूरदर्शनचे महासंचालक कंचन प्रसाद, दूरदर्शन वृत्तचं महासंचालक कंचन प्रियाकुमार उपस्थित होते. यावेळी महाकुंभाच्या जागतिक प्रसारण आणि इतर कार्यक्रमां विषयी चर्चा झाली.

---------------------------------------------

महापरिनिर्वाण/चैत्य भूमी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त, राज्यभरातून येणाऱ्या अनुयायांसाठी, चैत्यभूमीवर पायाभूत सुविधा मुंबई महापालिकेनं केल्या आहेत. पालिकेकडून नियंत्रण कक्ष, रुग्णवाहिका, आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालय आदी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यावेळी पालिकेच्या जनसंपर्क विभागाच्यावतीनं, डॉ.आंबेडकर यांच्या जीवन पटावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

---------------------------------------------

जागतिक मृदा दिन

आज जागतिक मृदा दिन. दरवर्षी पाच डिसेंबर रोजी, निरोगी मातीच्या महत्त्वावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि माती संसाधनांच्या शाश्वत व्यवस्थापना बाबत जागृती करण्यासाठी हा दिवस पाळण्यात येतो. यंदाची या दिनाची मध्यवर्ती संकल्पना, 'मातीची काळजी:मोजदाद, निरीक्षण आणि व्यवस्थापन' अशी आहे. जागतिक मृदा दिनाच्या निमित्तानं, आज केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या, नागपुरातील, राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि भूमी उपयोग नियोजन कार्यालयात, विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

-------------------------------------------

हवामान

विदर्भात मागील चोवीस तासांत, सर्वात किमान तापमानाची नोंद, चंद्रपूर इथं सतरा अंश सेल्सिअस इतकी झाली आहे तर, कमाल तापमान, भंडारा इथं ३२.४ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. नागपुरात किमान तापमान अठरा पूर्णांक आठ दशांश अंश सेल्सिअस इतकं राहीलं. दरम्यान, पुढील पाच दिवसांत, विदर्भातील अनेक जिल्ह्यात, तुरळक ठिकाणी, पाऊस पडण्याची शक्यता, हवामान खात्यानं वर्तवली आहे. आज यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली इथं तर उद्या, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांत काही ठिकाणी, हलका पाऊस पडू शकतो. येत्या सात डिसेंबर रोजी भंडारा आणि गोंदिया वगळता, संपूर्ण विदर्भात तुरळक पाऊस पडण्याचा अंदाज आहे. दरम्यान आज बुलढाणा शहरात तसंच, जिल्ह्यातील काही भागात, पावसानं अचानक हजेरी लावल्यानं, सर्वत्र गारवा निर्माण झाला होता, हा गारवा नागरिकांच्या आरोग्यास, हानिकारक असल्यामुळ, नागरिकांनी काळजी घ्यावी असं आवाहन, जिल्हा वैद्यकीय प्रशासनाकडून करण्यात आलं.

-------------------------------------------

तूर पीक/सोयाबीन खरेदी

वर्धा जिल्ह्यात तूर पीक फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत असून, त्यावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सद्यस्थितीत असलेले थंड हवामान आणि मागील काही दिवसांपासून, धुके पडत आहे. तसंच ढगाळ वातावरण हे तुरीवरील शेंगा पोखरणा-या अळीच्या वाढीस पोषक आहे. त्यामुळ उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे. यासाठी शेतकऱ्यांनी, एकात्मिक व्यवस्थापना संबंधी उपाय योजना करण्याची गरज आहे असं आवाहन, कृषि विज्ञान केंद्राचे विशेषज्ञ, डॉ.निलेश वझिरे आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ जीवन कतोरे यांनी केलं आहे. दरम्यान वर्धा जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी, नाफेड मार्फत १५ डिसेंबरपर्यंत सोयाबीन खरेदी सुरु आहे. याबाबत काही अडचण असल्यास, जिल्हा मार्केटिंग अधिकारी, शेख यांच्या ९३७२४ ८८२९० या मोबाईल क्रमांकावर, संपर्क साधावा असं, कळविण्यात आलं आहे.

-------------------------------------------

मेळघाट रस्ते

मेळघाट या आदिवासी क्षेत्रातील रस्त्यांच्या कामांकरिता २२ कोटी वीस लाखांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये ग्रामीण, जिल्हा आणि इतर जिल्हा मार्ग आदी ६६ रस्त्यांचा समावेश आहे. निवडणुकीमुळ रखडलेल्या या कामांना आता गती आली असून, या कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यते करिता सी.ई.ओं.कडे

**सादर करण्यात आला आहे. त्यामुळ प्रशासकीय मान्यते नंतर लगेच निविदा प्रक्रिया आणि कामांना सुरुवात होईल.**

**---------------------------------------------**

**क्रिकेट**

**महिला क्रिकेटमधे, भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या एक दिवसीय मालिकेत आज ब्रिस्ब्रेन इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताचा संघ ३५व्या षटकातच शंभर धावा करुन गारद झाला तर, ऑस्ट्रेलियानं सतराव्या षटकात पाच गड्यांच्या मोबदल्यात ही धावसंख्या पार केली.**

******